**राजेंद्र माने कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी, आंबव, देवरुख.**

## शिवजयंती

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी बुधवार, दि. १९ फेब्रुवारी २०२० रोजी राजेंद्र माने अभियांत्रिकी महाविद्यालय, आंबव येथे शिवजयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम पहाटे ३:०० वाजता महाविद्यालयातील शिवप्रतिष्ठान व राष्ट्रीय सेवा योजना या संघटनांच्या शिक्षक व विद्यार्थी सदस्यांनी शिवज्योत आणण्यासाठी संगमेश्वर तालुक्यातील कसबा येथील छत्रपती संभाजी महाराजांच्या समाधी स्थळ प्रस्थान केले. तेथे कर्णेश्वर मंदिराची साफसफाई करण्यात आली.

यानंतर श्री. प्रद्युम्न माने यांच्या हस्ते शिवज्योतीची विधिवत पूजा करून, शिवज्योत घेऊन सर्वजण महाविद्यालयाकडे मिरवणुकीने निघाले.

महाविद्यालयात ढोलताशांच्या गजरात मिरवणुकीने शिवज्योत व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली. यानंतर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून महाविद्यालयाच्या आवारातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्यास मानवंदना देण्यात आली.

यानंतर महाविद्यालयात शिवचरित्राचे अभ्यासक डॉ. केदारनाथ फाळके यांचे व्याख्यान संपन्न झाले. यावेळी प्रथम संस्थेचे अध्यक्ष श्री. रवींद्रजी माने यांच्या हस्ते डॉक्टर फाळके यांचे तुळशीचे रोपटे देऊन स्वागत करण्यात आले यानंतर प्राचार्य डॉ. भागवत व श्री. रवींद्रजी माने यांची प्रास्ताविकपर भाषणे झाली. आपल्या व्याख्यानात डॉ. फाळके यांनी 'छत्रपती शिवरायांचे कालातीत व्यवस्थापन तंत्र व त्याची आजच्या काळासाठी असलेली उपयोजितता' या विषयावर अनेकविध उदाहरणे देऊन श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक व विद्यार्थ्यांनी या व्याख्यानाचा लाभ घेतला. यावेळी प्रबोधन शिक्षण प्रसारक संस्थेचे संस्थापक माजी आमदार रवींद्र माने यांच्यासह व्याख्याते श्री. अभय भंडारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर महेश भागवत व अन्य मान्यवर उपस्थित होते.

दुपारी माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा घेण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली शिवप्रतिष्ठानचे शिक्षक प्रतिनिधी श्री. अच्युत राऊत आणि महाविद्यालयातील इतिहास मंचाचे शिक्षक प्रतिनिधी श्री. विशाल पारकर यांसह या संघटनांच्या विद्यार्थी सदस्यांनी परिश्रम घेतले.



